## दहशतवाद्यांविरोधात एकत्रपणे काम करा -अमित शाह



**श्रीनगर** : जम्मू काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाल्यामुळे अशांतता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे तीन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर आहेत. उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीत केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी सुरक्षा दलांना एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केल्याचे सूत्रांनी सांगितले. ऑगस्ट २०१९मध्ये कलम ३७० रद्द केल्यानंतर गृहमंत्री शाह पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. गृहमंत्र्यांनी सर्व सुरक्षा यंत्रणांना शक्य तेवढ्या लवकर दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी एकत्रितपणे काम करण्यास सांगितले तसेच दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या कट्टरपंथीयांवर नियंत्रण ठेवण्यास सूचित केले आहे.

रविवार, २४ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ९७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पनवेल मनपा क्षेत्रात १०० टक्के नागरिकांना पहिली मात्रा/३
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर 'अर्थ प्रहर'/४
आरपीएल नॉकआउट स्पर्धा उत्साहात/६

# टी-२० वर्ल्डकपमध्ये आज भारत-पाकिस्तान आमनेसामने; उत्सुकता शिगेला

**दुबई** : **वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी (दि. २४) भारत आणि पाकिस्तान या दोन कट्टर पारंपरिक संघांमध्ये लढत रंगणार आहे. या हाय होल्टेज थराराकडे उभय देशांसह जगभरातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागून राहिले आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान संघाचा सुपर १२मधील हा पहिला सामना आहे. त्यामुळे सलामीचा सामना जिंकण्याचा दोन्ही संघांचा प्रयत्न असेल. वर्ल्डकपमधील इतिहास पाहता दोन्ही संघ आतापर्यंत पाच वेळा आमनेसामने आले आहेत. पाचही वेळा भारताने विजय मिळवला आहे. त्यातच या स्पर्धेतील दोन्ही सराव सामन्यांत भारताने विजय मिळवला आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसारख्या संघांना टीम इंडियाने पराभूत केले. त्यामुळे पाकविरुद्धच्या सामन्यात भारताचे पारडे जड दिसते. दरम्यान, या सामन्यावर कोट्यवधींचा सट्टा लागल्याचे वृत्त आहे.



**भारतीय संघ**

विराट कोहली (कर्णधार), रोहित शर्मा, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत, इशान किशन, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, राहुल चहर, आर. अश्विन, शार्दुल ठाकूर, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमरा, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी. राखीव खेळाडू श्रेयस अय्यर, दीपक चहर, अक्षर पटेल.

**पाकिस्तानचा संघ**

बाबर आझम (कर्णधार), मोहम्मद रिझवान, फखर जमान, मोहम्मद हफीज, शोएब मलिक, आसिफ अली, इमाद वसीम, शादाब खान, शाहीन आफ्रिदी, हसन अली, हरीस रऊफ, हैदर अली.

# कर्जतमध्ये भाजपचा मेळावा

## आगामी निवडणुकांची पूर्वतयारी; कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

**कर्जत** : **बातमीदार**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने कर्जत मंडल बूथ अध्यक्ष आणि शक्तीकेंद्र प्रमुख यांच्या मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी (दि. २२) किरवली येथील साईकृपा शेळके मंगल कार्यालयात करण्यात आले होते. या वेळी माजी पालकमंत्री तथा भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने सर्वसामान्य माणसाचा विचार करून अनेक योजना दिल्या आहेत. महिला भगिनींना उज्ज्वला योजनेंतर्गत मोफत गॅस कनेक्शन, मुद्रा योजनेतून होतकरू तरुणांना व्यवसायासाठी कर्जाची उपलब्धता, गरीब कल्याण योजनेंतर्गत सर्वसामान्य जनतेला धान्यवाटप, प्रधानमंत्री आवास योजनेतून गोरगरिबांना घरे देणे, किसान सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना दोन हजार रुपयांच्या तीन हप्त्यांत सहा हजार रुपये रक्कम डीबीटीच्या माध्यमातून देणे यांसारख्या अनेक योजना मोदी सरकारच्या माध्यमातून राबविल्या गेल्या. त्याचप्रमाणे कोरोना काळात मोफत लस दिली जात आहे. या सर्व योजना घेऊन भाजप कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांपर्यंत गेले पाहिजे.

या मेळाव्याला भाजपचे कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष व पनवेलचे नगरसेवक प्रकाश बिनेदार, जि. प. सदस्य अमित जाधव, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, राजेश भगत, चिटणीस रमेश मुंढे, नितीन कांदळगावकर, सुनील गोगटे, संजय कराळे, किरण ठाकरे, कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, माथेरानचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, **(पान २ वर..)**

> **आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शत प्रतिशत भाजप हा मंत्र घेऊन आपण जनतेसमोर जाऊ आणि भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त सदस्य निवडून आणू.**
> **-आमदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री**




(छाया : संतोष पेरणे)

### राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

या वेळी आमदार निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत नेरळ मोहाचीवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते अनिल मिरकुटे, राजेंद्र वाघमारे, रवींद्र जाधव, विजय जाधव, प्रकाश मिरकुटे, सुनील वाघमारे, अजय वळवी, राजेश मुकणे, मंगेश वाघमारे, नितीन मिरकुटे, अभिषेक वाघमारे, लक्ष्मण मुरकुटे, ऋतिक हिलम, करण वाघमारे, विनोद कातकरी, कैलास मुकणे, अंकुश वळवी, हरेश वाघमारे, बाळ वारे, राजीक खान, प्रतीक बांगर, गणेश पवार, स्वप्नील वळवे, सुनील वाघ, आकाश वळवी यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पक्षाची शाल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

# मनोरंजन अनलॉक २.०ला पनवेलकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

**पनवेल** : **रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हातर्फे भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये रंगलेल्या संगीत, नृत्य व नाटकांच्या मेजवानीने परिपूर्ण अशा मनोरंजन अनलॉक-२.० कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने रंगभूमी अनलॉक झाल्याने नागरिकांनी कार्यक्रमाचे स्वागत, तसेच आयोजकांना मनःपूर्वक धन्यवाद दिले.



पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २२) झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सांस्कृतिक सेलचे प्रदेश अध्यक्ष तथा लातूर महापालिकेचे गटनेते शैलेश गोजमगुंडे, सहसंयोजक उमेश घळसाथी, प्रदेश सदस्य सुजित सिन्हा, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, चिन्मय समेळ, सांस्कृतिक सेलचे शहर सहसंयोजक गणेश जगताप, संजीव कुलकर्णी, अमोल खेर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रबंध व नियंत्रण उपाय म्हणून पनवेल महापालिका क्षेत्र, तसेच संपूर्ण राज्यात खबरदारीचा उपाय म्हणून नाट्यगृह संपूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते, परंतु नुकतेच काढलेल्या परिपत्रकात २२ ऑक्टोबरपासून नाट्यगृह सुरू करण्यात यावे, असे जाहीर करण्यात आले. **(पान २ वर..)**

## निवडक

### अनन्याने मोबाइलमधून चॅट्स, नंबर केले डिलीट?

**मुंबई** : क्रूझवरील ड्रग्ज पार्टीप्रकरणी एनसीबीला बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडे आणि तुरूंगात असलेला आर्यन खान यांचे व्हॉट्सअॅप चॅट्स सापडले आहेत, मात्र अनन्याने तिच्या मोबाइलमधील काही चॅट्स व नंबर डिलीट केल्याचा संशय एनसीबीला आहे. त्यामुळे एनसीबीने तिचा मोबाइल फोन, लॅपटॉपसह इतर इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स चौकशीसाठी फॉरेन्सिक विभागाकडे पाठवले आहेत.

### केंद्र सरकारने व्हॉट्सअॅप आणि फेसबुकला ठणकावले

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने जारी केलेल्या नव्या आयटी नियमावलीसंदर्भात व्हॉट्सअॅप आणि फेसबुककडून दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आहे. यावर सरकारने न्यायालयात भूमिका मांडताना या दोघांनाही कायदा पाळावाच लागेल, असे ठणकावले आहे.

# औरंगाबाद की संभाजीनगर?

## राज्य सरकारच्या जीआरवरून पुन्हा वाद

**औरंगाबाद** : **प्रतिनिधी**

औरंगाबाद शहराचे नाव संभाजीनगर करण्याचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. राज्य सरकारच्या एका जीआरमध्ये संभाजीनगर असा उल्लेख केल्याने हा वाद उफाळून आला आहे.

जागतिक गुंतवणूक प्रोत्साहन परिषदेत सरकारकडून औरंगाबादच्या राम भोगले यांची निवड करण्यात आली. यात काढण्यात आलेल्या जीआरवर त्यांच्या नावासमोर संभाजीनगर असा उल्लेख करण्यात आला आहे. यावर शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी औरंगाबादचे नाव संभाजीनगर झाले असून फक्त औपचारिक घोषणा बाकी असल्याचे सांगितले.





दरम्यान, औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांनी सरकारच्या जीआरवर असलेल्या संभाजीनगर नावाचा उल्लेख केल्याचा विरोध केला आहे. निवडणूक आली की हे धंदे सुरू होतात. ज्या अधिकाऱ्याने या जीआरवर सही केली त्यांना बडतर्फ करावे. तुम्ही तुमच्या मर्जीनुसार शहराचे नाव बदलू शकत नाही. सरकार तुमचे आहे, हिंमत असेल तर करून दाखवा, असा इशाराही जलील यांनी दिला आहे.

दरम्यान, यापूर्वीही औरंगाबाद शहराच्या नावावरून मोठा वादंग झाला होता. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यालयाच्या सीएमओ महाराष्ट्र या अधिकृत ट्विटर हँडलवर औरंगाबादचा उल्लेख संभाजीनगर करण्यात आला होता. त्यावरून काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत विरोध दर्शवला होता. महाविकास आघाडीचे सरकार हे किमान समान कार्यक्रमावर चालते. कोणत्याही शहराच्या नामांतराला आमचा ठाम विरोध आहे, असे ट्विट थोरात यांनी केले होते, तर महाविकास आघाडीचे तीनही पक्ष एकत्र येऊन चर्चा केल्यानंतरच एखादा निर्णय घेतात. औरंगाबादच्या नामकरणाबाबतही तीन पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी दिली होती.

# लस उत्पादकांसोबत पंतप्रधान मोदींची बैठक

**नवी दिल्ली** : **वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २३) कोरोना लसीच्या भारतीय उत्पादकांशी संवाद साधला. या वेळी केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविय आणि आरोग्य राज्यमंत्री भारती पवार हेही उपस्थित होते.



सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, भारत बायोटेक, डॉ. रेड्डीज लॅबोरेटरिज्, झायडस कॅडिला, बायोलॉजिकल ई, जेनोव्हा बायोफार्मा आणि पॅनासिया बायोटेक या सात लस निर्मात्यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

देशाने १०० कोटी लसीकरणाचा टप्पा पार केल्यानंतर ही बैठक झाली असून येणाऱ्या काळात देशात लसींचा पुरवठा आणि त्याचे नियमन कशा पद्धतीने होणार यावर चर्चा झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्वांना खूप वेगाने हलवले. आरोग्य मंत्रालयापासून सर्वांना तत्काळ कामाला लावले. जर ते नसते तर आज भारत एक अब्ज डोस बनवू शकला नसता, असा निर्वाळा सीरम इन्स्टिट्यूटचे प्रमुख सायरस पुनावाला यांनी दिला आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना कोरोनाची लागण


**मुंबई** : **प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांच्या मातोश्रींना कोरोनाची लागण झाली आहे. राज ठाकरेंना बरे वाटत नसल्याने मुंबईत होणारा मनसे कार्यकर्ता मेळावा पुढे ढकलण्यात आला होता, मात्र आता राज यांना कोरोनाची लागण झाल्याचे समोर आले आहे.



राज ठाकरेंना कोरोनाची सौम्य लक्षणे जाणवत होती. त्यांना तापही आल्याची माहिती मिळत आहे. त्यांनी आणि त्यांच्या मातोश्रींनी कोरोनाचे दोन्ही डोस घेतले आहेत, मात्र त्यानंतरही त्यांचे कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, कोरोनाचे निदान झाल्यानंतर राज हे लीलावती रुग्णालयात दाखल झाले. त्यांना तपासल्यानंतर घरीच क्वारंटाइन करणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.





शॉप नंबर ४, ५, ६ निळकंठ दर्शन, प्लॉट १२५ ए/४, जुना मुंबई पुणे रोड, ओरियन मॉल समोर, पनवेल

वामन हरी पेठे सन्स

संस्कृतीचा सुवर्ण साज!!

www.wamanharipethesons.com | follow us on

No credit card charges on jewellery purchase टोल फ्री १८००२२४६६२

गूगल प्लेस्टोर मध्ये जाऊन **वामन हरी पेठे सन्स** चे ऍप डाउनलोड करा आणि **सोने खरेदी करा.**

आपल्या सर्व शाखा सोमवार दिनांक २५ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर रोजी कार्यरत असतील.

# काँग्रेसमध्ये मनमानी कारभार!

## निलंबित पदाधिकाऱ्याचा उपोषणाचा इशारा; बाळासाहेब थोरातांवर नाव न घेता आरोप

**अहमदनगर : प्रतिनिधी**

पक्षविरोधी कारवाया करीत असल्याच्या आरोपावरून पदावरून निलंबित करण्यात आलेल्या अहमदनगर शहरातील बाळासाहेब भुजबळ यांनीच आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्यावर नाव न घेता गंभीर आरोप केले आहेत. निलंबन कारवाईबाबत झालेल्या अन्यायाविरोधात मुंबईत पक्षाच्या कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहोत, असेही भुजबळ यांनी सांगितले.

प्रदेशाध्यक्षपदी राहिलेल्या या नेत्याने आपल्या नात्यातील मंडळींना पक्षात स्थान देत आपल्यावर अन्याय केला आहे. आपण ओबीसींचा मेळावा घेतल्यापासून आणि एका पदाधिकाऱ्याचा आघाडी धर्माच्या विरोधात काम करण्याचा सल्ला न ऐकल्याने पक्षात त्रास देण्यास सुरुवात केली. त्यातून पुढे ही निलंबनाची कारवाई झाली आहे. या



विरोधात आपण श्रेष्ठींकडे दाद मागत असून आठ दिवसांत फेरविचार न झाल्यास मुंबईत पक्ष कार्यालयासमोर उपोषण करणार आहोत, असा इशाराही भुजबळ यांनी दिला आहे.

अहमदनगर शहरातील ब्लॉक कमिटीचे अध्यक्ष असलेल्या भुजबळ यांना दोन दिवसांपासून पदावरून निलंबित करण्यात आले आहे. त्यानंतर आपली बाजू मांडण्यासाठी त्यांनी शनिवारी (दि. २३) पत्रकार परिषद आयोजित केली होती. यामध्ये त्यांनी राज्याचे महसूलमंत्री आणि तत्कालीन प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्यावर त्यांचे नाव न घेता आरोप केले. तर थोरात यांचे भाचे आणि युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सत्यजित तांबे यांच्यावरही भुजबळ यांनी उघड आरोप केले.

त्यांनी सांगितले की, मी आणि माझ्या समर्थकांना पक्षात डावलले गेले. पक्षात ठराविक नेत्यांच्या नातलगांनाच पदे मिळत आहेत. त्यांच्या स्वीय सहायकांनाही पदे दिली जात आहेत. मधल्या काळात आपण एकदा ओबीसींचा मेळावा घेतला. माझ्याकडे ओबीसींच्या संघटननेचे पदही आले. तेव्हापासून आपल्याला आणखीच डावलले जाऊ लागले. माझ्यावर कारवाई करताना प्रदेशाध्यक्ष पटोले यांच्यावरही दबाव आणण्यात आला आहे. बऱ्याच गोष्टी त्यांच्या परस्पर होत आहेत. आपण जेव्हा त्यांना भेटलो, त्यावेळी संयुक्त बैठक घेऊन हा विषय मिटवू, असे ते म्हणाले होते. त्यामुळे आता पुन्हा एकदा आपण आपली बाजू श्रेष्ठींकडे मांडली आहे. आठ दिवस वाट पाहणार आहोत. त्यानंतर आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात मुंबईत पक्षाच्या कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहोत, असेही भुजबळ यांनी सांगितले.

शहरातील अनेक जुने कार्यकर्ते आपल्यासोबत असल्याचा दावाही भुजबळ यांनी केला. पक्षाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला १६ वर्षांपूर्वी शहराध्यक्ष पद दिले याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. मात्र, मला त्या पदावरून आणि पक्षातून काढण्यासाठी ज्या नेत्याने सातत्याने प्रयत्न केले ते पदाने, पैशाने कितीही मोठे असले तरी त्यांचे कार्य किती संकुचित आहे, हे यातून दिसून येते,' असा आरोपही भुजबळ यांनी केला.

या वेळी त्यांच्यासोबत राजेश बाठिया, फिरोज खान, एम. आय. शेख, संतोष कांबळे, संजय झोडगे हे कार्यकर्ते उपस्थित होते.

# खारघरच्या आरोग्य केंद्रात डेंग्यू निदान किट उपलब्ध

## भाजप नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या मागणीला यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या वतीने पनवेल महापालिकेकडे केलेल्या मागणीनुसार खारघर सेक्टर १२ येथील नागरी आरोग्य केंद्रात डेंग्यूचे निदान त्वरित होण्यासाठी अँटिजेन (एनएस १) कार्ड टेस्ट किट उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी सभागृह नेते परेश ठाकूर व पनवेल महापालिकेच्या आरोग्य केंद्राला भेट देऊन आभार मानले.



सरत्या पावसाळ्यानंतर डेंग्यूचा प्रादूर्भाव वाढतो व साथ पसरण्याचा धोका असतो. अशा वेळी त्वरित निदान झाल्यास रुग्णावर वेळीच उपचार होऊन डेंग्यूच्या रुग्णांत होणारी जीवघेणी गुंतागूंत टाळता येते. म्हणून भाजप खारघर नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या वतीने पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे खारघरच्या नागरी आरोग्य केंद्रात डेंग्यूचे निदान त्वरित होण्यासाठी अँटिजेन (एनएस १) कार्ड टेस्ट किट उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेस सूचना दिल्या. त्यानंतर थोड्याच दिवसात किट उपलब्ध करण्यात आले. यामुळे आता डेंग्यूचे त्वरित निदान होऊन साथीला अटकाव करणे शक्य होणार आहे.

भाजप खारघरच्या पदाधिकारी व नगरसेवकांनी आरोग्य केंद्राला भेट देऊन सभागृह नेते परेश ठाकूर व पनवेल महापालिकेचे आभार मानले. या वेळी भाजप खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष दिलीप जाधव, सरचिटणीस दीपक शिंदे, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी बेहरा आदी उपस्थित होते.

## निवडक

### उरणमध्ये एकाची ऑनलाइन फसवणूक

**उरण :** ओएलएक्स या ऑनलाइन शॉपिंग ॲपवर बेड खरेदी करणे एका व्यक्तीला चांगलेच महाग पडले. सुभोदिप बलराम बॅनर्जी यांना तब्बल एक लाख ९५ हजारांना लुबाडण्यात आले आहे. याबाबत न्हावाशेवा पोलीस ठाण्यात विकास कुमार या व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुभोदिप यांनी ओएलएक्स या ऑनलाइन शॉपिंग ॲपवरून पाच हजार ५०१ रुपयांना बेड खरेदी केला, मात्र बेड खराब असल्याने हा बेड परत केला आणि त्यांनी भरलेले पैसे परत मागितले. या वेळी विकास कुमार नामक या व्यक्तीने संपर्क साधून सुभोदिप यांच्याकडून दोन बँक खात्यांची वेगवेगळी कारणे सांगून डिटेल्स मागवून घेतली. त्यानंतर सुभोदिप यांच्या दोन्ही खात्यातून विकास कुमार याने एक लाख ९५ हजारांची रक्कम काढून घेतली. यानंतर विकासकुमार यांनी आपला मोबाइल बंद केला. फसवणूक झाल्याचे समजताच सुभोदिप यानी याबाबत न्हावाशेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार या प्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

### प्रणोती भावसार यांना पुरस्कार

**पनवेल :** जनसेवा संघ मुंबई संचलित नेरे हायस्कूल, नेरे भागशाळा विहिघर व नेरे ज्यू कॉलेज, पनवेल येथील उपक्रमशील तंत्रस्नेही गणित शिक्षिका प्रणोती विवेक भावसार (एमएससी, बीएड, डीएसएमए) यांची उडान फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार २०२१साठी निवड झाली आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष रिझवान खान व सचिव विशाल गुजर यांनी शैक्षणिक सामाजिक कार्यास निवडपत्र देऊन प्रणोती यांना सन्मानपात्र केले आहे. या पुरस्काराचे वितरण १४ नोव्हेंबर २०२१ रोजी औरंगाबाद येथे होणार आहे. मागील २१ वर्षांपासून गणित विज्ञान विषयाचे अध्यापनाचे व एसएससी गणिताचे मार्गदर्शन भावसार या करीत आहे. कोरोना काळात त्यांनी यूट्यूब चॅनलद्वारे आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे ज्ञान दिले. पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.



### क्रीडा विद्यापीठासाठी बोधचिन्ह स्पर्धा

**मुंबई :** राज्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचे बोधचिन्ह (लोगो) ठरविण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली असून, आकर्षक, कल्पक आणि रचनात्मक बोधचिन्ह ३१ ऑक्टोबर २०२१ पूर्वी isumharashtragmail.com या ई-मेलवर पाठवावी. या स्पर्धेची अधिक माहिती https://sports.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध असून स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे करण्यात आले आहे.

# कामोठ्यातील समस्या सोडविण्याची मागणी

## सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे गावातील विविध समस्यांबाबत नगरसेविका कुसुम म्हात्रे यांच्या वतीने त्यांचे पती रवींद्र म्हात्रे यांनी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन दिले आहे.

कामोठे गावातील अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. या रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडलेले आहेत. याबाबत नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसंदर्भात माझ्याकडे अनेक वेळा तकारी केल्या आहेत, तसेच अनेक समस्या उद्भवत आहेत. कामोठे गावात नव्याने रस्ता काँक्रिटीकरण करण्यात यावा. अनेक ठिकाणी हा रस्ता खचलेल्यामुळे नागरिकांना पायी चालणेही कठीण होत आहे.



पावसाचे पाणीही मोठ्या प्रमाणात साचले होते. या वेळी नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसंदर्भात अनेक वेळा तकारी केल्या आहेत. ड्रेनेजसुद्धा अनेक ठिकाणी खचलेले आहे. ड्रेनेज नव्याने तयार करण्यात यावे. रस्ता तयार करताना रस्त्यामधून जाणाऱ्या ड्रेनेजवर विट बांधकाम न करता सिमेंटचे पक्के बाधकाम काँक्रिटी बॉक्स करण्यात यावे. पाण्याची नव्याने पाइपलाइन टाकण्यात यावी.

त्याचसोबत रस्ता काँक्रिटीकरण झाल्यानंतर नव्याने लाईटच्या वायर व नवी लाईटचे पोल टाकण्यात यावे. रस्त्याची कामे संबंधित खात्यामार्फत तातडीने करण्यात यावी व कामोठ्यातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात यावे, असे नगरसेविका कुसूम म्हात्रे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# सायबर चोरट्याचा तरुणीला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

अदलाबदल केलेल्या सीम कार्डचे व्हेरीफिकेशन करण्याच्या बहाण्याने एका सायबर चोरट्याने जीएम महाविद्यालयातील एका विद्यार्थिनीला दोन लाखांचा गंडा घातला आहे. सायबर चोरट्याविरोधात कामोठे पोलिसांनी फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली २१ वर्षीय विद्यार्थिनी कामोठे येथील एमजीएम महाविद्यालयात बीडीएसचे शिक्षण घेत असून सध्या ती एमजीएमच्या गर्ल्स हॉस्टेलमध्ये राहते. १९ ऑक्टोबर रोजी विद्यार्थिनीला एका सायबर चोरट्याने बीएसएनएलमधून जीओमध्ये अदलाबदल केलेल्या सीम कार्डचे व्हेरिफिकेशन करण्याच्या बहाण्याने संपर्क साधला, तसेच त्यासाठी ११ रुपयांचा बॅलेन्स टाकावा लागेल असे सांगून तिला मोबाइलमध्ये एनी डेस्क हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानुसार विद्यार्थिनीने चोरट्याचे ऐकून ११ रुपयांचे रिचार्ज केले. नंतर पोस्ट खात्याच्या आयपीपीबी या ॲपद्वारे तिला आधारकार्ड व एटीएमचे फोटो काढण्यास सांगून तिच्या एसबीआयच्या बचत खात्यातील जमा रक्कम, तसेच पोस्टच्या खात्यातील स्कॉलरशिपची अशी एकूण दोन लाख ३४२२ रुपये दुसऱ्या खात्यात वळती करून घेतली.

याबाबत विद्यार्थिनीच्या मोबाइलवर मेसेज आल्यानंतर तिने सायबर चोरट्यांकडे विचारणा केली असता, त्याने थोड्या वेळात पैसे परत मिळतील, असे सांगून टाळाटाळ केली. त्यानंतर सायबर चोरट्यांकडून आपली फसवणूक झाल्याचे विद्यार्थिनीच्या लक्षात आल्यानंतर तिने कामोठे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# कामोठ्यात फिवर क्लिनिकचे उद्घाटन

**पनवेल : प्रतिनिधी**

कामोठे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात शनिवारी (दि. २३) तापाचा दवाखाना (फिवर क्लिनिक) सुरू करण्यात आला आहे. या दवाखान्याचे उद्घाटन नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते व नगरसेविका हेमलता म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात शनिवारी आरपीजी फाउंडेशनच्या सीएसआर फंडातून मिळालेल्या केबिनमध्ये हा तापाचा दवाखाना सुरू झाल्याने नागरिकांना एकाच छताखाली सर्व सुविधा मिळणार आहेत. या ठिकाणी ताप, सर्दी, खोकला, गरोदर मातांच्या तपासण्या, बालकांचे दैनिक लसीकरण, आरटीपीसीआर, अँटिजन चाचण्याही होणार आहेत, तसेच रुग्णांना औषधेही या ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

याआधी हा तापाचा दवाखाना जवळील अंगणवाडीमध्ये सुरू होता. या वेळी आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ. मनीषा चांडक, डॉ. नेहा, डॉ. स्वाती माने, रवी गोवारी, काकासाहेब कुत्तरवडे, तसेच केंद्रातील इतर वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत रविवार, दि. २४ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

**कोविशिल्ड**

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. रोटरी क्लब, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

**कोवॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

**कोरोना लसीकरणासंदर्भात ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सूचना रविवार, दि. २४ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामीण लसीकरण होणार नाही, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**


# विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील इमारतींना सिडकोतर्फे पाण्याची जोडणी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

पाण्याची अत्यावश्यक गरज लक्षात घेता विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील (रिहॅबिलीटेशन ॲण्ड रिसेट्लमेन्ट) पॉकेट क्र. १ ते ७ मधील करंजाडे आणि उलवे येथील अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) प्राप्त न झालेल्या इमारतींना पाण्याची जोडणी देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आलाय. या जोडण्यांकरिता आकारण्यात येणारे पाण्याचे दर हेदेखील अन्य प्राधिकरणे अथवा स्थानिक शासन संस्थांपेक्षा कमी आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानजीकच्या क्षेत्रात पुष्पक नोड हे सर्व पायाभूत सोयीसुविधांनी युक्त असे पुनर्वसन आणि पुनःस्थापन क्षेत्र विकसित करण्यात येत असून प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे.

ज्या सदनिकाधारकांची इमारत पूर्ण झालेली असून काही नियामक अडचणींमुळे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यास विलंब होत असल्यास सदनिकाधारकांनी पाण्याच्या नळजोडणीसाठी सीबीडी बेलापूर येथील रायगड भवन कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात येत आहे.

विमानतळ प्रकल्पबाधितांनी सिडकोला नेहमीच सहकार्य केले आहे. याची जाण ठेऊन पाण्याची जोडणी देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे, असे सिडकोचे एमडी डॉ. संजय मुखर्जी यांनी सांगितले.

पान १ वरून

### कर्जतमध्ये भाजपचा मेळावा

नगरसेवक बळवंत घुमरे, नगरसेविका स्वामिनी मांजरे, माथेरान अध्यक्ष प्रवीण सकपाळ, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष स्नेहल गोगटे, नेरळ शहराध्यक्ष नम्रता कांदळगावकर, संतोष भोईर, प्रमोद पाटील, केशव तरे, रोशन पाटील, राहुल कुलकर्णी, राजन लोभी, प्रकाश पेमारे, संभाजी गरूड, संतोष शिंगाडे, नरेंद्र कारले, धनंजय धुळे, राहुल मुकणे, बिनीता घुमरे, मृणाल खेडेकर, श्रद्धा कराळे, सुप्रिया भगत, सरिता पादीर यांच्यासह तालुक्यातील २०० बूथ अध्यक्ष आणि ५० शक्तीकेंद्र प्रमुख उपस्थित होते.

### मनोरंजन अनलॉक २.०ला पनवेलकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने मनोरंजन अनलॉक २.० : संगीत, नृत्य व नाटकांची मेजवानी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात नृत्य आराधना कलानिकेतन ग्रुप, आदई आणि स्टार प्लसवरील डान्स प्लस ५ फेम पनवेलकर्स ग्रुप यांनी नृत्य सादर केली. सामगंध ग्रुप पनवेल यांच्या गाण्यांची सुरेल मैफल रंगली. त्यानंतर अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे विजेते कलांश थिएटर, रत्नागिरीतर्फे 'बारस' हे धमाल विनोदी नाटक सादर झाले. या सर्व मनोरंजनात्मक कार्यक्रमाला रसिकांनी उदंड प्रतिसाद देत आयोजकांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे मल्हार टीव्हीने थेट प्रक्षेपण केले होते.

### समाधान नावकर

**पनवेल :** रिपब्लिकन चळवळीचे खंदे समर्थक समाधान नावकर यांचे शनिवारी (दि. २३) निधन झाले. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी पँथर, रिपब्लिकन चळवळीत सहभाग घेतला होता. नावकर यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. अनेक लढ्यात, चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता.



## दुखवटा

### अब्दुल रहिमान आदम फोपळूणकर

**माणगाव :** तालुक्यातील मोर्बा येथील शेकापचे जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य निजाम फोपळूणकर यांचे पिताश्री अब्दुल रहिमान आदम फोपळूणकर (वय ७८) यांचे शुक्रवारी (दि. २२) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पै. अब्दुल रहिमान आदम फोपळूणकर हे मोर्बा ग्रामपंचायतीचे पाच वर्ष उपसरपंच होते.



# पनवेल महापालिका क्षेत्रात १०० टक्के नागरिकांना पहिली मात्रा

## ▪ कोरोना प्रतिबंधक लसीकरणाला वेग

**पनवेल : प्रतिनिधी**

कोरोना प्रतिबंधक लसीकरणात पनवेल महापालिकेने आपल्या क्षेत्रात १८ वर्षांवरील १०० टक्के नागरिकांना कोविडचा पहिला डोस दिला आहे. महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्या निर्देशानुसार योग्य नियोजन केल्यामुळे हे शक्य झाले.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार १६ जानेवारीला महापालिका क्षेत्रात कोविड लसीकरणास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात पहिल्या फळीतील कर्मचाऱ्यांचे यामध्ये पोलीस विभाग, महसूल विभाग आदी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. तिसऱ्या टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. यानंतर ४५ ते ६० वयोगटातील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. शेवटच्या टप्प्यात १८ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.

लसींचा साठा मोठ्या प्रमाणात येऊ लागताच पनवेल महापालिकेच्या वतीने सुरुवातीला असलेली १२ लसीकरण केंद्र वाढवून २३ केली, तसेच जास्तीत जास्त लसीकरण होण्याच्या दृष्टीने प्रत्येक लसीकरण केंद्रांची क्षमता तीन पट वाढविली. यामुळे दर दिवशीचे सरासरी १३ ते १४ हजार लसीकरण दररोज करण्यात आले.

पालिका हद्दीतील ग्रामीण भागातील जनतेसाठी प्रत्येक गाव-पाड्यांवर लसीकरण सत्र उभारण्यात आले. यामुळे १०० टक्के गावांचे लसीकरण होऊ शकले. शासकीय ओळखपत्र नसणाऱ्यांचे विशेष लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात आले. वारांगना, बेडरिडन, गर्भवती, दिव्यांग अशा विविध घटकांना सामावून त्यांचे विशेष लसीकरण आयोजित करण्यात आले. पालिका हद्दीतील विविध वृद्धाश्रम, तळोजा जेल या ठिकाणीही लसीकरण करण्यात आले.


लसीकरण जास्तीत जास्त प्रमाणात होण्याकरिता ७९ खाजगी रुग्णालय यांना अर्बन टास्क फोर्स अंतर्गत मान्यता देऊन जवळपास १५० खाजगी लसीकरण केंद्रांना मान्यता दिल्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील लसीकरण व मोठ्या सोसायट्यांमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात लसीकरण झाले.

गेल्या काही दिवसांपासून मिशन कवच कुंडल अंतर्गत पालिका क्षेत्रातील १०० टक्के नागरिकांचे लसीकरण पूर्ण होण्याकरिता आयइसी, बॅनर, माईकिंग, मान्यवरांचे व्हिडिओ याद्वारे पालिकेने जनजागृती केली. यासाठी जवळपास ७० टीम कार्यरत करून सोसायटीनिहाय व एरियानिहाय मोबाइल लसीकरण बूथ उभारण्यात आले.

आतापर्यंतच्या या सर्व नियोजनामुळे पनवेल महापालिकेचे एकूण ८,१४,००० लोकसंख्येपैकी १८ वर्षांवरील ५,९८,१२७ लोकसंख्येपैकी ५, ४६,७४७ इतक्या लोकांनी पहिला डोस घेतला आहे. म्हणजेच जवळपास ९१.४१ लोकांनी पहिला डोस घेतला आहे, तसेच २,८७,२१७ नागरिकांचा दुसरा डोस म्हणजे जवळपास ४८ टक्के पूर्ण करण्यात आला आहे.

मिशन कवच कुंडल आणि पल्स् पोलिओ अभियानांतर्गत जनतेस आवाहन व सर्व्हे केला. दरम्यान, असे आढळून आले की जे ५३,३३१ शिल्लक नागरिक आहेत हे नागरिक मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथे कामानिमित्त जात असतात त्यांचे त्या ठिकाणीच लसीकरण झाले आहे. तरी कोविड १९च्या डोसचे १०० टक्के लसीकरण पालिकेने पूर्ण केले आहे.






> सध्या शहरी भागात २५ लसीकरण केंद्र सुरू असून ग्रामीण भागात ३० ठिकाणी आठवड्यातील ठराविक दिवशी लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. ज्या नागरिकांचे दुसऱ्या डोसचे लसीकरण राहिले आहे त्यांनी आपले लसीकरण पूर्ण करून घ्यावे.
> –गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका

# उरण रेल्वेस्थानकाच्या कामाला वेग

## खारकोपर ते उरण सेवा सुरू होण्याची शक्यता

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण ते बेलापूर या रेल्वेमार्गावरील बेलापूर ते खारकोपर मार्गावरील रेल्वेसेवा सुरू झाली आहे, मात्र खारकोपर ते उरण मार्गावरील कामे प्रलंबित असल्याने हा मार्ग अद्याप सुरू करण्यात आलेला नाही. या मार्गावरील रेल्वेस्थानकांच्या कामाला सध्या वेग आलेला दिसत आहे. लवकरच ही कामे पूर्ण होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



उरण ते बेलापूर (सीवूड्स) दरम्यान लोकल सुरू करण्याची घोषणा १९९७ साली झाली होती, मात्र यातील अडथळे निर्माण झाल्याने ती लांबणीवर पडली होती. दोन वर्षांपूर्वी या मार्गावरील पहिल्या टप्प्यातील बेलापूर ते खारकोपर मार्गावर रेल्वेसेवा सुरू झाली आहे. या वेळी लवकरच पुढील सेवा सुरू करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. मात्र काही नागरिकांनी विरोध केल्याने या मार्गावरील कामे रखडली होती. दोन महिन्यांपूर्वी जासई परिसरातील या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी सिडकोकडून मोहीम राबवण्यात आली. त्यानंतर येथील कामांना वेग आला आहे. उरण रेल्वेस्थानकाचे काम सुरू असून ते लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. सिडको व रेल्वे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा मार्ग तयार होत आहे.

याबाबत सिडकोच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी जासईच्या पुढील कामांची जबाबदारी ही रेल्वे विभागाची असल्याने हा मार्ग निश्चितपणे कधी सुरू होणार याची माहिती रेल्वे विभागच देऊ शकतो, असे सांगितले.

# शेतकऱ्यांना मोबदला देण्यास टाळाटाळप्रकरणी सिडकोला न्यायालयाकडून जप्तीची नोटीस

**उरण : प्रतिनिधी**

न्यायालयाच्या आदेशानंतरही उरणमधील तीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची सुमारे सव्वाकोटीची रक्कम देण्यात दिरंगाई करणाऱ्या सिडकोला अलिबाग न्यायालयाने वसुलीसाठी उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन मालमत्ता जप्तीची नोटीस बजावली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर बेलिफ, शेतकरी आणि वकिलांच्या फौजफाट्यासह आलेल्यांना उरण मेट्रो सेंटरने पैसे जमा करण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली आहे.

सिडकोच्या साडेबारा टक्के भूखंडाच्या वाढीव नुकसानीची रक्कम उरणच्या तीन शेतकऱ्यांना अदा करण्याचे आदेश न्यायालयाने २०१९ रोजी दिले होते, मात्र तीन वर्षांच्या कालावधीतही सिडकोने शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्यात चालढकलपणा चालविला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही सिडकोकडून उरणच्या शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आली नसल्याने संतप्त झालेल्या जयंत नारायण तांडेल (रा. करळ, उरण) यांच्यासह अन्य दोन शेतकऱ्यांनी सुमारे तीन कोटी १५ लाखांहून अधिक रकमेच्या वसुलीसाठी अलिबाग न्यायालयात धाव घेतली होती.

अलिबाग सहा दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश सो. द. घनवट यांनी शेतकऱ्यांच्या वाढीव नुकसानीची रक्कम वसुलीसाठी सिडकोच्या उरण मेट्रो सेंटरमधील कार्यालयीन सामान जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. अलिबाग न्यायालयाचे बेलिफ सागर शिंदे, वकील ॲड. सुशांत घरत, ॲड. रत्नदीप पाटील, ॲड. प्रशांत कडव यांच्यासह उरण मेट्रो सेंटरच्या कार्यालयीन सामानाची जप्तीच्या कारवाईसाठी नोटीस बजावण्यासाठी पोहचले होते. कार्यालयीन मालमत्तेची जप्तीची नोटीस बजावण्यासाठी फौजफाट्यासह पोहचल्यानंतर उरण मेट्रो सेंटरने शेतकऱ्यांना वाढीव नुकसानीची रक्कम लवकरात लवकर जमा करणार आहोत. तशी लेखी हमीपत्र देण्यात आले आहे.

## निवडक

### अंकुश जाधव यांना पुरस्कार



**कळंबोली :** शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष सतीश मोहन पाटील यांच्या कळंबोली येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात गेली १६ वर्षे कार्यरत असणारे निवी गावचे सुपुत्र अंकुश जाधव यांना विविध संस्थांकडून तीन वेळा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अंकुश जाधव हे एक दिव्यांग शिक्षक असून अत्यंत बुद्धिमान, प्रामाणिक, कष्टाळू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्य खरोखरच उल्लेखनीय, प्रशन्सनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन श्री साई प्रतिष्ठान पुणे, राष्ट्रीय काव्यांगण लेखणीचे साहित्य मंच तथा सामाजिक संघटना आणि नुकताच राजनंदिनी बहुउद्देशीय संस्था आणि श्री राजपूत करणी सेना जळगाव आदी सामाजिक संस्थांनी आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले आहे. अंकुश जाधव यांचे कौतुक होत आहे.

### अपघातग्रस्त वाहनाचा शोध

**पनवेल :** तळोजा येथील मुंब्रा-पनवेल रोडवर तळोजा गाव पापडीचा पाडा गावासमोर झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या प्रकरणी कारणीभूत असलेल्या अपघातग्रस्त वाहनाचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. अपघातात गणेश दाजी जाधव (वय ३०, रा. तळोजा) यांना एका अज्ञात वाहनाने ठोकर दिल्याने त्यांचा भोला अस्लम पठाण यांच्या दुकानासमोर अपघातात मृत्यू झाला आहे. अपघात झाला त्या वेळी कोणीही अपघात पाहिला असेल किंवा ज्या वाहनाने अपघात केला त्या वाहनाचा प्रकार, वाहनाचा नंबर किंवा इतर माहिती कोणाकडे असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४१२३३३, ९६६४५९९१९१ किंवा पो. उपनिरीक्षक विजय यादव यांच्याशी संपर्क साधावा, असे तळोजा पोलीस ठाण्याच्या वतीने सांगण्यात आले आहे.


# भातकापणीसाठी मजुरांचा अभाव

**उरण : रामप्रहर वृत्त**

**उरणमधील शेतकरी चिंतातूर**

रायगडात भातकापणी सुरू झाली असून सर्वत्र शेतमजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी भातकापणीसाठी भातकापणी यंत्राचा वापर करतो, मात्र उरण तालुक्यात हे भातकापणी यंत्र पोहचले नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना भातपीक कापण्यासाठी मजुरांशिवाय पर्याय उरला नसल्याने मजुरांअभावी भातपिकांची कापणी वेळेवर होत नसल्यामुळे येथील शेतकरी चिंतातुर झाला आहे.

भातकापणीकरिता मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदिल आहेत. उरण तालुक्यात विभागात अनेक ठिकाणी आदिवासी मजुरांचा वापर होतो. उरण तालुका हा भाताचे कोठार समजले जाते, परंतु मागील काही वर्षांपासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत आहे. त्यातच भातशेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओला दुष्काळ, तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली न आणता त्या ओसाड ठेवल्या जातात. भातकापणीकरिता कृषी खात्याकडून ५० टक्के अनुदानातून भातकापणी यंत्र उपलब्ध करून देण्यात येते. शेतकरी असल्याचा दाखला, सातबारा उतारा व बँक खाते, पासबुक आदी कागदपत्रे शेतकऱ्यांनी कृषी खात्याकडे दिली तर त्यांना हे यंत्र ५० टक्के सवलतीच्या दराने मिळणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले, परंतु शेती परवडत नसल्याने भातपीक कापणी यंत्र घ्यायलाही कोणीच तयार होत नाही. यात वेळेवर मजूर मिळत नसल्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे.



# रेल्वेच्या धडकेत माय-लेकाचा मृत्यू

## रसायनीतील घटना

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वावेघर येथील दोघा माय-लेकाला रेल्वेची धडक लागून मृत्यू झाल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

सुनीता चंद्रकांत पाटील (वय ४५) व प्रणय चंद्रकांत पाटील (वय २२) असे या दोघा माय-लेकाचे नाव आहे. हे दोघे तुराडे गावासमोरील आपटा ते पनवेल रेल्वेरूळाच्या दिशेने जाताना त्यांना रेल्वेची धडक लागून त्यात ते मयत झाले. हा अपघात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास झाला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात सीआरपीसी १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर अधिक तपास करीत आहेत.

# मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेत ४०७ विद्यार्थ्यांचे लसीकरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेंतर्गत नवी मुंबई महापालिकेने २२ ऑक्टोबरपासूनच १० महाविद्यालयांमध्ये लसीकरणाला सुरुवात केलेली आहे. शासनाने दिलेल्या उद्दिष्टानुसार १८ वर्षांवरील १०० टक्के नागरिकांचे लसीकरण पूर्ण करणारे नवी मुंबई हे एमएमआर क्षेत्रातील पहिले शहर असून महाविद्यालयीन लसीकरणावर लक्ष केंद्रीत करत त्या ठिकाणी विशेष लसीकरण सत्रे आयोजित करण्यात येत आहेत.

मिशन युवा स्वास्थ्य मोहीम सर्व महाविद्यालयांमध्ये २ नोव्हेंबरपर्यंत राबविली जात असून पहिला व दुसरा कोविशिल्ड डोस, तसेच कोवॅक्सिनचा दुसरा डोस दिला जात आहे. कॉलेजमधील विद्यार्थ्यांप्रमाणेच प्राध्यापक, प्राध्यापिका आणि इतर कर्मचारी यांचेही या मोहिमेमध्ये लसीकरण केले जाणार आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आतापर्यंत ११ लाख ११ हजार १५४ नागरिकांनी कोविड लसींचा पहिला डोस घेतला असून पाच लाख ८३ हजार ४६३ नागरिकांनी दुसरा डोस घेतलेला आहे. जास्तीत जास्त नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण व्हावेत याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने नियोजन केले असून कोविशिल्डच्या पहिल्या डोसची तारीख होऊन ८४ दिवस झालेल्या नागरिकांना दूरध्वनी करून दुसरा डोस घ्यावा म्हणून सूचित करण्यात येत आहे. पहिल्या डोसप्रमाणेच दुसऱ्या डोसचेही उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण व्हावे हा प्रयत्न असून यादृष्टीने विविध माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

तरी नवी मुंबईकर नागरिकांनी आपला पहिला डोस घेऊन विहित कालावधी पूर्ण झाल्यानंतर लगेचच नजीकच्या महानगरपालिका लसीकरण केंद्रावर जाऊन लसीचा दुसरा डोस त्वरित विनामूल्य घ्यावा, असे सूचित करीत महापालिका आयुक्त बांगर यांनी आगामी उत्सवी कालावधी बघता कोविड सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन केले आहे.



# उरण सोनारी येथे उत्पादनांचे प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) पंचायत समिती उरणच्या माध्यमातून व ग्रामपंचायत सोनारी यांच्या सहकार्याने सोनारी सिद्धिविनायक तलाव येथे बुधवारी (दि. २०) स्वयंसहायता समूहांनी बनवलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला होता.




या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती उरणच्या सभापती, उपसभापती विद्यमान सदस्या, सदस्य सोनारी ग्रामपंचायतच्या सरपंच पूनम कडू व सर्व सदस्य, जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश राऊळ, जिल्हा व्यवस्थापक चंद्रशेखर पाटील, तालुका अभियान व्यवस्थापक प्रतिम सुतार, बँकसखी गौरी कडू, समुदाय संसाधन व्यक्ती किशोरी कडू, अंकिता तांडेल, प्रीती ठाकूर, निर्मला प्रभाकर घरत आदी उपस्थित होत्या.

या मेळाव्यात २१ स्वयंसहायता समूहांनी बनवलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. मेळाव्याचे आयोजन करण्यासाठी गटविकास अधिकारी नीलम गाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# नवी मुंबईतील समस्या सोडविण्याची मागणी

## भाजपप्रणीत श्रमिक सेनेचे आयुक्तांना निवेदन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने काढलेल्या फी संदर्भातील परिपत्रकाचे नवी मुंबईतील काही शाळा पालन करत नाहीत. अशा शाळांच्या व्यवस्थापकांना परिपत्रक काढून शाळेला नियमांचे पालन करायला सांगावे. यासह जुईनगरमधील स्थानिक रहिवाशांच्या अन्य समस्यांबाबतचे निवेदन भाजपप्रणीत श्रमिक सेना चिटणीस विजय साळे यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त अभिजित बांगर यांना दिले आहे.

नवी मुंबईत काही खाजगी शाळांत चुकीच्या पद्धतीने पिटीए निवड केली गेली आहे. विद्यार्थी एकाच शाळेत शिकत असून वारंवार त्याच्याकडून री ॲडमिशनचे पैसे मागत आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांचे फ्रॉम भरून घेतले जात नाहीत. काही विद्यार्थ्यांना शाळेंनी अद्याप शाळा सोडल्याचा दाखला दिला नाही. आदींबाबत लवकरात लवकर परिपत्रक काढावे, असे निवेदनात साळे यांनी म्हटले आहे. याशिवाय जुईनगरमधील हाऊसिंग सोसायट्यांना होत असलेला कमी दाबाने पाणीपुरवठा, मलनिस्सारण वहिनी वारंवार चोकअप समस्या, फेरीवाल्यांचे अतिक्रमण, नियमित न होणारी धूरफवारणी आदी समस्या निवेदनात मांडण्यात आल्या आहेत.



या वेळी संबंधित शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन पालकांच्या समस्या सोडवण्याचे, तसेच जुईनगरमधील समस्या सोडवण्याचे आश्वासन बांगर यांनी दिले. या वेळी अभिजित पवार, सरनोबत प्रमोद कांबळे, अजय साळे, समीर पवार हे पालक उपस्थित होते.

# बीटकॉईनच्या किंमतीचा विक्रम, पण जे टिकतील त्यांच्यासाठीच!




**२०१५ मध्ये २६६ डॉलरला एक ते आज ६६ हजार डॉलरला एक बीटकॉईन, हा आहे बीटकॉईनच्या किमतीचा सहा वर्षांतला प्रवास आणि मध्ये प्रचंड चढउतार. ज्याला हे हेलकावे झेपतात, त्यांनी बीटकॉईनच्या गुंतवणुकीत पडावे. ज्याला ही जोखीम पेलवणार नाही, त्याने अशा गुंतवणुकीत अजिबात पडू नये.**

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

बीटकॉईनचा अवतार जगात येऊन आता एक तप पूर्ण झाले आहे. सरकारचा पाठिंबा नसलेले हे आभासी चलन कसे चालेल, त्याच्यावर लोक कसा विश्वास ठेवतील, असे अनेकांना वाटत होते. त्यामुळे त्यात भाग घेणाऱ्यांची संख्या या काळात कमीच राहिली. पण ऑक्टोबरमध्ये काही घटना अशा घडत आहेत की बीटकॉईन किंवा क्रीप्टोकरन्सी नावाने माहिती झालेली ही आभासी चलने जगातील अधिकाधिक लोक स्वीकारताना दिसत आहेत. सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदारांनी याकडे वळावे की नाही, हा मोठाच पेच आहे. पण त्यापूर्वी बीटकॉईनच्या जगात सध्या काय चालले आहे पहा.

गेल्या गुरुवारी म्हणजे २१ ऑक्टोबर रोजी बीटकॉईनची किंमत एका बीटकॉईनला ६६ हजार डॉलर एवढी विक्रमी झाली होती.त्याला एक कारण निमित्त झाले. अमेरिकेत बीटकॉईनचा एक्सचेंज ट्रेडेड फंड (म्युच्युअल फंडसारखा) जाहीर झाला आणि त्याला सरकारची मान्यताही मिळाली. याचा अर्थ असा की अमेरिकन नागरिक आता शेअर बाजारासारखे बीटकॉईनच्या गुंतवणुकीवर तुटून पडणार. आर्थिक जगाचे नेतृत्व करणाऱ्या अमेरिकेच्या या फंडामुळे बीटकॉईनच्या अस्तित्वाला अधिकृत स्वरूप मिळाले आहे. म्हणजे असे फंड जर इतर देशातही निर्माण झाले तर बीटकॉईनचे ट्रेडिंग जगभर वाढत जाणार आणि त्याची किंमतही.



## भारतीय स्वीकारतील का?

विकसित जगातील गुंतवणूकदारांना शेअर बाजार आणि त्यावर आधारित आर्थिक उत्पादने नवी नाहीत. तेथील निम्म्यापेक्षा अधिक जनतेची गुंतवणूक त्या उत्पादनांत आहे. त्या तुलनेत भारतीयांनी अजून शेअर बाजाराचाही स्वीकार केलेला नाही. मग ते बीटकॉईन स्वीकारतील का? असा प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो. पण आकडेवारी असे सांगते की भारतीयही त्यात भाग घेऊ लागले आहेत. भारताची लोकसंख्या प्रचंड असल्याने भाग घेणाऱ्या नागरिकांची टक्केवारी खूप कमी असते, पण ती कमी असूनही विकसित देशांच्या तुलनेत ती अधिक ठरते. त्यामुळेच टक्केवारीच्या दृष्टीने कमी असूनही गेल्या काही दिवसांत बीटकॉईनच्या ट्रेडिंगचे मूल्य १०० टक्के वाढले असल्याचे बीटकॉईन एक्स्चेंजेसनी म्हटले आहे. बीटकॉईनच्या किंमती वाढल्यामुळे त्याचे जगातील मूल्य आता २.६ ट्रिलियन डॉलर झाले आहे. याचा अर्थ ते आता भारताच्या जीडीपीशी स्पर्धा करू लागले आहे. बीटकॉईनचे मूल्य गेल्या १२ वर्षात एवढे होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## बंदी घालणे, एवढे सोपे नाही

आता प्रश्न असा निर्माण होतो की काहीही न करता अशा पद्धतीने पैसा कमावणे, जग मान्य करणार आहे का आणि ज्याला कोणत्याही सरकारचा पाठिंबा नाही, अशा बीटकॉईन्सचे व्यवहार जगाला कोठे घेऊन जाणार आहेत? पण आर्थिक जगाला त्याच्याशी काही देणेघेणे नाही. ती एक कमोडिटी आहे, त्यामुळे त्याच्या व्यवहारांवर बंदी घालता येणार नाही, असे न्यायालयीन निर्णय येऊन गेले आहेत. भारत सरकारने त्याविषयी काळजी व्यक्त करून बंदीचा बडगा उगारला होता, पण तो चालला नाही. याचा अर्थ असा की देशांच्या चलनाशी स्पर्धा करणाऱ्या बीटकॉईन्सच्या व्यवहारांवर बंदी घालणे, एवढे सोपे नाही, हे भारताच्या आणि जगाच्या लक्षात आले आहे. त्यामुळे भारतासह अनेक देश आपले डिजिटल चलन सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## २६६ डॉलर ते ६६ हजार डॉलर!

भारतातील उच्च उत्पन्न गटातील बहुतेक नागरिकांनी शेअर बाजार आणि त्याच्याशी संबंधित उत्पादनांमध्ये गुंतवणूक केलेली असते. हा वर्ग आर्थिकदृष्ट्या साक्षर तर असतोच, पण अतिशय सजग असतो. जेव्हा बीटकॉईनची भारतात ओळख तयार होत होती, तेव्हाच या वर्गातील अनेकांनी त्यात गुंतवणूक सुरू केली होती. बीटकॉईनच्या किमतीतील चढउतार हा वर्ग सहन करू शकतो. २०१५ मध्ये एका बीटकॉईनचा दर होता २६६ डॉलर आणि आज आहे ६६ हजार डॉलर! अगदी गेल्या एका वर्षाचा विचार करावयाचा झाला तरी नोव्हेंबर २०२० मध्ये तो दर होता १३ हजार डॉलर आणि एकाच वर्षांत तो झाला त्याच्या पाच पट! पुढे, पुरेशी माहिती न घेता जे या गुंतवणुकीत पडले, ते नागरिक चांगलेच पोळून निघाले, पण आता काही भारतीय गुंतवणूकदार आता या गुंतवणुकीत स्थिरावले असल्याचे दिसते. कारण आता ते सारखी खरेदी विक्री न करता दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून त्याकडे पाहू लागले आहेत, असे भारतातील बीटकॉईन एक्स्चेंजेसचे निरीक्षण आहे. (काही बीटकॉईन एक्स्चेंजेसची नावे अशी – मुंबई– WazirX, CoinDCX, बंगळुरू – CoinswitchKuber, ABuyUCoin.) ही नावे आपल्यासाठी आज नवी असली, तरी इंग्रजी वर्तमानपत्रांच्या आर्थिक पानांवर आणि अर्थविषयक टीव्ही चॅनेलवर ती नियमित दिसू लागली आहेत. याचा अर्थ त्याला वाचक आणि प्रेक्षक आहे, असा होतो.

## भाग घ्यावा की न घ्यावा?

बीटकॉईन्सचे व्यवहार ही एक साखळी आहे. कोणा एका माणसाने काही गणिते संगणकावर करून ठेवली असून ती सोडवून बीटकॉईन तयार होतात. त्याला मायनिंग म्हणतात. ते त्या क्षेत्रातील काही अभियंते जगभर करत आहेत. ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे हे सर्व शक्य होते. ही अशी साखळी आहे, ज्यात मानवी हस्तक्षेप करता येत नाही, असे मानले गेले आहे. थोडक्यात, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा बीटकॉईन्स हा एक भाग आहे. या तंत्रज्ञानाचा बँकिंग, भूमापन अशा अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापर सुरुही झाला आहे. इंटरनेटने जसे जग बदलले, तसाच एक मोठा बदल हे तंत्रज्ञान करण्यास सज्ज झाले आहे. त्यामुळे त्यातील फक्त बीटकॉईन्सला नकार देता येणार नाही, असे आज जगाने ठरविलेले दिसते. थोडक्यात, त्याचे अस्तित्व आपल्याला मान्य करावे लागणार आहे. त्यामुळे त्याच्या किंमती वाढत जाणार, त्याचे ट्रेडिंग होत राहणार, त्यावर सट्टा खेळला जाणार, हे ओघाने आलेच. आपण त्यात पडायचे की नाही, याचे एकच उत्तर आज दिले जाऊ शकते, ते म्हणजे ज्याला त्यातील जोखीम मान्य आहे, त्याने भाग घ्यावा. ज्याला मान्य नाही, त्याने भाग घेऊ नये. नाहीतरी शेअर बाजार आणि कमोडिटी बाजारातील ट्रेडिंगमध्येही जोखीम असताना ते करणारे लोक आहेतच की!







# पेटीएमचा सुपरडुपर आयपीओ कसा असेल?

**डिजिटल व्यवहार सुलभ करण्याची सुरुवात ज्या पेटीएमने केली, त्याची कंपनी म्हणजे 'वन ९७ कम्युनिकेशन्स'. तिच्या आयपीओला सेबीने मंजुरी दिली आहे. सर्वात मोठा आयपीओ, असे त्याचे वर्णन केले जात असल्याने त्याची आपल्याला माहिती असली पाहिजे.**


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

मागील आठवड्यातील लेखात आपण नायका कंपनीबद्दल पहिले तर आज आपण आगामी आणखी एका सुपरडुपर आयपीओबद्दल जाणून घेऊयात. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी डिजिटल इंडियासाठी नवीन दालन उघडलं गेलं आणि आज प्रत्येकाच्याच ते अंगवळणी पडलं. फेरीवाल्यांपासून ते उच्चभ्रू वर्गातील वर्तुळात याबद्दल केवळ चर्चाच नाही तर त्याचा सर्रास वापर होऊ लागला, त्याबद्दलच्या जाहिराती देखील सरळ, सुलभ, कळतील अशा केल्या गेल्या, पेटीएम करो! आणि आज आपण पाहतोय की आपल्या बहुतांश व्यवहारांचा हा अविभाज्य भाग बनला गेलाय. ही कंपनी सुरुवातीस पेमेंट वॉलेट, युनिफाईड पेमेंट्स वरून आता पेमेंट बँक, स्टॉकब्रोकिंग, म्युचअलफंड्स, इन्शुरन्स या विश्वात देखील दाखल झालेली आहे.

'पे थ्रू मोबाइल', संक्षिप्तपणे पेटीएम हे उत्पादनाचं नांव असून याच्या कंपनीचं नांव 'वन ९७ कम्युनिकेशन्स' असं आहे. ही एक नोएडा स्थित डिजिटल पेमेंट सिस्टम, ई–कॉमर्स आणि फायनान्समध्ये माहीर असलेली एक भारतीय बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपनी आहे. सध्या पेटीएम ११ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे आणि मोबाईल रिचार्ज, युटिलिटी बिल पेमेंट, प्रवास, चित्रपट बुकिंग, फार्मसी बिल, शैक्षणिक संस्थांचं शुल्क भुगतान, इव्हेंट बुकिंग त्याचप्रमाणे क्यूआर कोडच्या साहाय्यानं किराणा, दुकान, फळं आणि भाजीपाला दुकानं, रेस्टॉरंट्स, पार्किंग, टोल इत्यादी ऑनलाइन वापर–व्यवहार प्रदान करते. कंपनीच्या म्हणण्यानुसार भारतभरातील दोन कोटीहून अधिक व्यापारी आपल्या बँक खात्यात पेमेंट स्वीकारण्यासाठी त्यांच्या क्यूआर कोड पेमेंट सिस्टमचा वापर करतात.

**कंपनीचा इतिहास** – पेटीएमची स्थापना ऑगस्ट २०१० मध्ये नोएडा येथील संस्थापक विजय शेखर शर्मा यांनी दोन दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या सुरुवातीच्या गुंतवणुकीने केली होती. जानेवारी २०१४ पर्यंत, कंपनीनं पेटीएम वॉलेट लॉन्च केलं होतं, जे भारतीय रेल्वे आणि उबरनं पेमेंट पर्याय म्हणून आपल्या प्रणालीबरोबर जोडलं होतं. ई–कॉमर्समध्ये ऑनलाईन व्यवहार आणि बस तिकिटिंगसह ते सुरू झाले. २०१५ मध्ये, त्यात शिक्षण शुल्क, मेट्रो रिचार्ज, वीज, गॅस आणि पाणी बिल अशा उपयोगितेच्या भरण्यासंबंधित गोष्टी समाविष्ट केल्या गेल्या, मात्र नोटबंदीनंतर सर्वत्र पेटीएमचा बोलबाला झाला आणि जवळपास सर्वच विक्रेत्यांकडं पेटीएमच्या क्यूआर कोडसह पेटीएम लोगो सर्वत्र झळकू लागले. क्यूआर (क्विक रिस्पॉन्स) कोड तंत्रज्ञानामुळं हे व्यवहार अगदी सुकर झाले आणि लगेचच काही महिन्यांतच १० कोटी ॲप डाऊनलोडचा टप्पा पार करणारं हे भारताचं पहिलं पेमेंट ॲप ठरलं. त्याच वर्षी म्हणजे २०१७ मध्ये कंपनीनं पेटीएम गोल्ड लॉन्च केलं जे वापरकर्त्यांना १ ग्रॅम इतकं शुद्ध सोनं ऑनलाइन खरेदी करण्याची मुभा देतं. नंतर कंपनीनं पेटीएम पेमेंट्स बँक आणि 'इनबॉक्स', चॅट पेमेंटसह एक मेसेजिंग प्लॅटफॉर्म देखील लॉन्च केला. पुढं २०१८ मध्ये कंपनीनं व्यापाऱ्यांना शून्य % शुल्कावर थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये पेटीएम, यूपीआय आणि कार्ड पेमेंट स्वीकारण्याची परवानगी देण्यास सुरुवात केली. कंपनीनं 'पेटीएम फॉर/विथ बिझनेस' ॲप लाँच केलं आणि व्यापाऱ्यांची समस्या समजून पैसे मिळाल्यावर व्हॉइस अनाऊन्समेंट डिव्हाईस देऊ केलं जेणेकरून प्रत्येक वेळेस मोबाईलवर किंवा खात्यामध्ये ग्राहकांनी दिलेले पैसे जमा झाले का नाही याची शहानिशा करत बसण्याची गरज भाऊ नये आणि व्यापाऱ्यांना त्यांच्या पेमेंट आणि दैनंदिन सेटलमेंटचा मागोवा घेण्याची सोय पुरवली गेली.

कॅनेडियन पेमेंट्ससाठी कंपनीनं मार्च २०१७ मध्ये कॅनडामध्ये आपले हात–पाय पसरले, तर जानेवारी २०१८ मध्ये, कंपनीनं चीनच्या अलिबाबा समूहाच्या मालकीची गेमिंग कंपनी एजीटेक होल्डिंग्जच्या संयुक्त उपक्रमात गेमपिंड हे एक मोबाइल गेमिंग प्लॅटफॉर्म लॉन्च केलं. ऑक्टोबर २०१८ मध्ये कंपनीनं जापनीज फिनटेक मार्केटमध्ये सॉफ्टबँक व याहू,जपान बरोबर पेपे (PayPay) हे मोबाईल पेमेंट ॲप उपलब्ध केलं. मार्च २०१९ मध्ये, कंपनीनं पेटीएम फर्स्ट नांवाचा सबस्क्रिप्शन बेस्ड लॉयल्टी प्रोग्राम लॉन्च केला आणि मे २०१९ मध्ये, पेटीएम फर्स्ट क्रेडिट कार्ड लॉन्च करण्यासाठी सिटी बँक बरोबर भागीदारी केली. मागील वर्षीच्या महामारीमध्ये टाटा स्टारबक्सनं पेटीएम बरोबर भागीदारी केली (जुलै २०२०) आणि त्यांच्या ग्राहकांना साथीच्या वेळी ऑनलाईन अन्नपेयं मागवण्याची सोय झाली. कंपनी रिटेल क्षेत्रात देखील ऑनलाईन प्रणालीसह उतरली असून फेब्रुवारी २०१७ मध्ये पेटीएमने आपले पेटीएम मॉलॲप लॉंच केलं जे ग्राहकांना १.४ लाख नोंदणीकृत विक्रेत्यांकडून खरेदी करण्याचं समाधान देतं.

सध्या कंपनी खालील उत्पादनाद्वारे उत्पन्न मिळवते...

**जाहिराती** – कंपनी कमाई वाढवण्यासाठी त्यांच्या ॲपवर जाहिराती आणि सशुल्क प्रचार सामग्री वापरते.

**पेमेंट वॉलेट** – (रिचार्ज आणि बिल भरण्याची परवानगी देण्याच्या बदल्यात नेटवर्क प्रदात्यांकडून कमिशन गोळा करते. ग्राहकांनी आपल्या पेटीएम ई–वॉलेटमध्ये ठेवलेल्या पैशांवर पेटीएम भागीदार बँकांपैकी एक एस्क्रो खाते उघडून आणि परस्पर सहमत व्याजदर मिळवून व्याज मिळवते.

**पेटीएम पेमेंट्स बँक** – पेटीएम पेमेंट बँक बचत खाती, तसेच डेबिट कार्ड आणि जलद आणि सुलभ पेमेंट करण्याची क्षमता देते. ते सध्या या ठेवींमधून शक्य तितका नफा घेत नाहीत कारण ते हे पैसे उधार देऊ शकत नाहीत. पेटीएम पेमेंट्स बँक एक लहान फायनान्स बँक बनू इच्छित आहे आणि फास्टॅगनं या उद्दिष्टाच्या एक पाऊल जवळ जाण्यास मदत केली आहे.

**यूपीआय** – पेटीएम सुरुवातीला यूपीआय व्यवसायावर लक्ष केंद्रित करून होतं, परंतु त्यांच्या अपेक्षेनुसार ते काम करत नाही हे लक्षात आलं आणि त्याच्या वाढीसाठी विपणनावर देखील भरपूर पैसा खर्च करावा लागतो. तरीदेखील यात आपसूक भर पडत जाईल.

**फास्टॅग टोल कलेक्शन** – फास्टॅग ही एक उत्तम व्यवसाय संधी आहे ज्यामध्ये पेटीएमने उडी घेतलेली आहे. पेटीएमला फास्टॅग सुरक्षा ठेवींद्वारे सुमारे ६९ कोटी रुपये मिळाले आणि आता हे पैसे गुंतवणूक आणि व्याज मिळवण्यासाठी वापरले जातील.

**पेटीएम क्रेडिट** – सध्या पेटीएम क्रेडिटनं मोठा प्रभाव पाडण्यास सुरुवात केली आहे. व्यापारी क्रेडिट आणि ग्राहक क्रेडिट हे त्यांच्या क्रेडिट विभागाचे दोन भाग आहेत. ग्राहक क्रेडिटमध्ये पेटीएम पोस्टपेड (म्हणजे एक महिन्याची क्रेडिट मर्यादा), वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड यांसाठी एसबीआयसह भागीदारीत असून त्यासाठी पेटीएमला सुमारे २–६% युनिट फी मिळते. सध्या या पर्यायात बजाज फायनान्स हा त्यांचा प्रमुख प्रतिस्पर्धी आहे. तर, सक्रिय व व्हेरीफाईड व्यापाऱ्यांना त्यांच्या वॉलेट क्रियाकलापावर आधारित क्रेडिट दिले जाते.

**पेटीएम मनी** – वर उल्लेखल्याप्रमाणं पेटीएमनं पेटीएम मनीद्वारे गुंतवणूक प्रकारात पाऊल ठेवलं आहे. कंपनीनं डायरेक्ट म्युच्युअल फंडद्वारे गुंतवणूक करण्यास संधी उपलब्ध करून दिल्यामुळं सर्वसामान्य गुंतवणूकदारांना याचा लाभ होताना दिसत आहे आणि त्यामुळं कंपनीस प्रचंड प्रमाणात वापरकर्ता अधिग्रहण होण्यास मदत झाली आहे, ज्यामुळं पेटीएम, नवीन एसआयपीचे भारतातील सर्वात मोठे प्रवर्तक बनलेले आहेत. त्याचप्रमाणं स्टॉकब्रोकिंगमध्ये पेटीएम किरकोळ गुंतवणूकदारांना कोणतेही शुल्क न आकारता डीमॅट खातं प्रदान करत आहे आणि डिलिव्हरीसाठी शून्य ब्रोकरेज तर झिरोधा या अग्रगण्य कंपनीस टक्कर देण्यास इंट्राडे ब्रोकरेज हे केवळ रु. १० ठेवलं गेलं आहे जिथे झिरोधा आणि अपस्टॉक्स २०/ऑर्डर मुळं प्रसिद्ध झाली होती. पेटीएमद्वारे त्यांच्या व्यासपीठाद्वारे पेन्शन योजना आणि सोन्यासाठी केलेल्या गुंतवणूकीवर देखील फी मिळवली जाते.

**पेटीएम विमा** – पेटीएम लहान लहान इलेक्ट्रॉनिक्स आणि स्मार्टफोनसाठी मायक्रो इन्शुरन्ससोबत टर्म, आरोग्य, मोटर यांसारख्या विमा सुविधा देखील पुरवतं. पॉलिसी बाजार हा त्यांचा प्रमुख प्रतिस्पर्धी आहे. पॉलिसी बाजारचे दर पेटीएमच्या दरांपेक्षा किंचित जास्त आहेत. उर्वरित जगाच्या तुलनेत, भारतामध्ये विमा क्षेत्रात मोठी संधी असून त्यास योग्य प्रकारे हाताळल्यास पेटीएमसाठी हा एक उज्वल यशाचा मार्ग ठरू शकतो.

**ई कॉमर्स** – यांखेरीज कंपनी पेटीएम मॉलद्वारे ईकॉमर्स मध्ये दाखल झालेली आहेच व ऑफलाईन व्यवसायिकांद्वारे त्यांच्या पॉईंट ऑफ सेल वरून झालेल्यास व्यवहारांवर १.८–२% चार्जेस आकारत आहे. पेटीएम ऑनलाइन व्यापाऱ्यांसाठी पेमेंट गेटवे प्लॅटफॉर्म प्रदान करते. भारतातील काही आघाडीच्या ऑनलाइन कंपन्या, ज्यात बिग बास्केट, स्विगी, IRCTC आणि Uber यांचा समावेश आहे, त्यांच्या ऑनलाइन चेकआउटसाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करतात. मोबिक्विक, रेझरपे, सीसी अव्हेन्यू हे सध्याचे स्पर्धक आहेत.

कंपनीची ग्रॉस मर्चंट व्हॅल्यू (GMV) वर्षानुवर्ष वाढत आहे. जीएमव्ही हे व्यापाऱ्यांना एका कालावधीत पेटीएमॲपवरील व्यवहाराद्वारे केलेल्या एकूण पेमेंटचं मूल्य आहे. यात पैसे हस्तांतरणासारख्या कोणत्याही ग्राहक–ते–ग्राहक पेमेंट सेवेचा समावेश नाही. कंपनीचा एकूण व्यापारी वर्ग आर्थिक वर्ष १९ मध्ये ११.२ दशलक्ष वरून वाढून आता २१.१ दशलक्ष झाला आहे. पेटीएमचं कार्यकारी उत्पन्नातील ७५% हिस्सा हा व्यापारी पेमेंट सेवांमधून येतो आहे. कंपनीचं एकूण उत्पन्न मागील वर्षीच्या ३५४०.७७ कोटी रुपये उत्पन्नावरून या वर्षी ३१८६.८ कोटी रुपयांवर आलेलं असून तोटा २९४३ रुपयांवरून १७०४ कोटी रुपयांवर आला आहे. एकूणच डिजिटल पेमेंटचा वाढता उपयोग आणि प्रत्येक आर्थिक क्षेत्रातील कंपनीचा प्रवेश हा नक्कीच डिजिटल इंडियासाठी स्वागतार्ह आहे आणि कंपनीचं भविष्य देखील यावरच अवलंबून आहे. अशा जबरदस्त भारतीय कंपनीचा आयपीओ पुढील महिन्यात येण्याचे संकेत आहेत ज्यासाठी १६६०० करोड रुपयांची आतापर्यंतची सर्वांत मोठी प्राथमिक समभाग भागविक्री करण्यास कंपनी सरसावली आहे. (या आधी कोल इंडिया १५२०० कोटी व रिलायन्स पॉवर ११००० कोटी रुपये) नक्कीच ही कंपनी ऐन दिवाळीमध्ये धमाका करणार हे नक्की...



# आदिवासींची पिळवणूक करून डांबले

## सुटकेसाठी सर्वहारा जनआंदोलन समितीचे पोलीस अधीक्षकांना साकडे

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदिवासींची आर्थिक पिळवणूक करून त्यांना डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी हस्तक्षेप करून पीडित कुटुंबातील व्यक्तींची सुटका करावी, अशी मागणी सर्वहारा जनआंदोलनाच्या वतीने रायगडच्या पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे.



माणगाव तालुक्यातील रातवड आदिवासीवाडीवरील मोतीराम सखाराम पवार यांचे कुटुंब कोळसा खाणीवर काम करण्यासाठी ऑक्टोबर २०२० मध्ये सांगलीला गेले होते. गेली वर्षभर त्यांच्याकडून निरनिराळी कामे करून घेण्यात आली, मात्र ठरलेला मोबदला ठेकेदाराने दिलाच नाही. वारंवार मागणी करूनही कामाचा मोबदला ठेकेदाराने दिला नाही. अशातच २४ सप्टेंबर २१ रोजी पवार यांच्या दोन मुलींचे मृतदेह एका विहिरीत आढळून आले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवले. या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, मृत मुलींच्या कार्यासाठी मोतीराम पवार आणि त्यांची पत्नी रातवडला येण्यास निघाले. तेव्हा त्यांच्या मोठ्या मुलीला ठेकेदारांनी डांबून ठेवले. पवार यांच्या इतर नातेवाईकांनाही घरी सोडण्यास नकार दिला. रातवड येथे आल्यावर सदर प्रकरणाची व्यथा पवार यांनी सर्वहारा जन आंदोलन समितीकडे मांडली. यानंतर त्यांनी या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांची तक्रार दाखल करून घेतली नाही. अखेर सर्वहारा जनआंदोलन समितीने या प्रकरणी पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्याकडे या प्रकरणात हस्तक्षेप करून डांबून ठेवलेल्या आदिवासींची सुटका करण्याची मागणी केली आहे.

**सुरुवातीला माणगाव पोलिसांनी याबाबत तक्रार दाखल करून घेण्यास नकार दिला. पोलीस अधीक्षकांकडे दाद मागितल्यावर आता ते गुन्हा दाखल करून घेण्यास तयार झाले आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास व्हायला हवा. त्या दोन मुलींचा मृत्यू नेमका कसा झाला, हेही तपासले गेले पाहिजे.**

**–उल्का महाजन, नेत्या, सर्वहारा जनआंदोलन**

**माणगाव पोलिसांना या प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर सांगली येथील पोलिसांशी संपर्क साधून पीडित कुटुंबाच्या सुटकेसाठी प्रयत्न केले जाणार आहेत.**

**–अशोक दुधे, पोलीस अधीक्षक, रायगड**

# पेण तालुक्यात दोन कोटी ७५ लाखांची बिले थकली

## महावितरणकडून कारवाईचा बडगा

**पेण : प्रतिनिधी**

महावितरणने पेण तालुक्यात थकबाकी वसुली मोहीम सुरू केली असून आजपर्यंत दोन हजार ८०० थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. ही कारवाई टाळण्यासाठी चालू बिलासह थकबाकीचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणच्या पेण कार्यालयाचे अभियंता उमाकांत सपकाळे यांनी केले आहे.



(छाया : अनिस मनियार)

पेण तालुक्यातील घरगुती, व्यापारी, औद्योगिक, कृषी अशी १६ हजार १६३ वीज ग्राहकांकडे दोन कोटी १६ लाख ५७ हजारांची थकबाकी आहे. वारंवार सूचना, पत्रव्यवहार, जनजागृती करूनही थकबाकीदार बिलाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करीत आहेत. अशा ग्राहकांवर महावितरणे कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत दोन हजार ८०० वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला असून ही मोहीम यापुढेही चालू राहणार आहे.

थकबाकी न भरल्याने ज्या ग्राहकांची महावितरणने वीज कापली आहे. त्यांना अंधारात राहायचे नसेल, तर लवकरात लवकर बिल भरणा करावा व वीज महामंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या पेण कार्यालयाचे अभियंता उमाकांत सपकाळे यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये शिवसेनेला जोरदार धक्का

## जि. प.चे माजी सभापती सुभाष गवळे राष्ट्रवादीत दाखल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती सुभाष गवळे यांनी आपल्या अनेक समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.



(छाया : संतोष पेरणे)

राज्यातील सत्तेत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असले, तरी कर्जत तालुक्यात हे दोन्ही पक्ष नेहमी एकमेकांना शह-प्रतिशह देत असतात. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लाड यांच्या उपस्थितीत वेणगाव (ता. कर्जत) येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रवादीचे अशोक भोपतराव, भगवान चंचे, सागर शेळके, शरद लाड आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

या मेळाव्यात जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती शिवसेनेचे सुभाष गवळे, चर्मकार संघटनेचे तालुका अध्यक्ष हरिचंद्र गायकवाड, वेणगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच उत्तम सोनावणे, ज्येष्ठ कार्यकर्ते उत्तम जाधव, विजय गायकवाड, विश्वास भालेराव, ईश्वर भालेराव, चंद्रकांत जाधव, विनोद भालेराव, सचिन जाधव, गणेश जाधव, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल गवळे, अमोल ढोले, अभी शिंदे, प्रल्हाद रातांबे, सुनील गवळे, राजू गवळे, प्रमोद गवळे, सुदाम गवळे, बाळाराम गवळे, साखर पंडित, जितू साबळे, विजय जाधव, जनार्दन ढेकणे, आत्माराम पाटील, संजय गवळे, सुभाष जाधव, प्रकाश सोनवणे, गौतम सोनवणे, आनंद सोनवणे, आकाश जाधव, प्रभाकर जाधव, प्रदीप सोनवणे, चंद्रकांत गायकवाड, सुभाष फाळे, विलास फाळे, आदर्श सोनवणे, संदेश सोनवणे, रत्नदीप गवळे, अविनाश सोनवणे, प्रभाकर सोनवणे, सदाशिव रा. तांबे, भगवान जाधव, रवींद्र सोनवणे, विशाल सोनवणे, सागर सोनवणे, निरज जाधव, हरिश्चंद्र सोनवणे, समाधान सोनवणे, राज सोनवणे, प्रफुल्ल जाधव, सनी सोनवणे, सुनील सोनवणे, गणपत साबळे, महेंद्र साबळे, शशिकांत जाधव, रोशन गायकवाड, केतन रा. तांबे, शेरू शेख, विष्णू पंडित, दीपक पंडित यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.

## पोलीस हवालदाराकडे खंडणीची मागणी; गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील हवालदाराकडेच ५० लाखांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार अलिबागमध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून धमकी देणारा इसम फरारी आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील हवालदार दीपक मोरे हे आपल्या कार्यालयात असताना अरुण बेलोसकर नावाच्या व्यक्तीने तेथे जाऊन मोरे यांना धमकावले. एका बिनशेती प्रकरणात तू एक कोटी रुपये कमावलेस, त्यातील ५० लाख रुपये मला दे, नाहीतर मी वरिष्ठांकडे तक्रार करीन, तुझी नोकरी घालवीन. नोकरी वाचवायची असेल तर मला पैसे दे, अशा शब्दात बेलोसकर याने दीपक मोरे यांना धमकावले.

याबाबत मोरे यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आपल्या घरी जाऊन बेलोसकरने कुटुंबीयांना धमकावल्याचे मोरे यांनी तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी सध्या बेलोसकर फरारी असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## महामार्गावर दोन वाहनांना आग

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटात शिंग्रोबा मंदिराजवळ पुण्याकडे जाणाऱ्या आयशर टेम्पोला शनिवारी (दि. २३) सकाळी अचानक आग लागली. या घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले मात्र तोपर्यंत टेम्पोची केबीन जळून पूर्णपणे खाक झाली.



दुसऱ्या घटनेत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मुंबईकडे जाणाऱ्या ट्रकचे लायनर गरम झाल्याने टायरने पेट घेतला. या आगीमध्ये ट्रकमध्ये असलेले रंग वितळून महामार्गावर पसरले व वाहने घसरू लागली. त्यामुळे महामार्ग सुरक्षा यंत्रणेने वाहतूक रोखून धरली. परिणामी द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या तीन ते चार किमी रांगा लागल्या होत्या. दरम्यान, महामार्ग पाण्याने धुऊन साफ केल्यानंतर सुमारे एका तासाने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## खोपोलीच्या डॉ. आंबेडकर रुग्णालयास वैद्यकीय साहित्याची मदत

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील रानसई येथील हुंतामाकी इंडिया लिमिटेड (पूर्वीची पॉझिटिव्ह पॅकेजिंग) कपंनीने खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाला शुक्रवारी (दि. २२) सात लाखांचे वैद्यकिय साहित्य, उपकरणे भेट दिली.

हुंतामाकी इंडिया कपंनीने शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाला आयसीयू मॉनिटर, बेड साईड लॉकर, स्ट्रेचर, व्हीलचेयर, ईसीजी मशीन, पीपीई किट, मेडिकल ट्रॉली आदी मिळून एकूण सुमारे सात लाख रुपयांचे वैद्यकिय साहित्य व उपकरणे दिली. खोपोलीच्या नगराध्यक्षा सुमन औसरमल, उपनगराध्यक्षा विनीता काबंळे, कपंनीचे अधिकारी नायडू, श्रीकांत गोडबोले, संदीप कुंभार, दीपक कानिटकर, नगर परिषदेचे आरोग्य सभापती आर्चना पाटील, नगरसेवक मोहन औसरमल, किशोर पानसरे, दिलीप जाधव, नगरसेविका जिनी सॅम्युअल, माधवी रिठे, सुनीता गायकवाड, वैद्यकिय आधिकारी डॉ. संगीता वानखेडे, स्मिता कोजगे, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील उपस्थित होते.




(छाया : अरूण नलावडे)

# खोपोलीतील नाट्यगृह मोजतेय अखेरची घटका!

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

राज्यातील सिनेमा आणि नाट्यगृहे शुक्रवारपासून सुरू झाली, मात्र खोपोली नगरपालिकेचे छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह (नाट्यगृह) अखेरची घटका मोजत आहे. या सभागृहातील अंतर्गत सजावटीसह विद्युत व्यवस्थेची दुरवस्था झाली आहे. खोपोली शहरातील कलावंत आणि नाट्यरसिकांनी हे सभागृह पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे.



खोपोली शहरातील नाट्यप्रेमींना नाटके बघण्यासाठी मुंबई, पुणे, नवी मुंबई, पनवेल आदी ठिकाणी जावे लागत होते, तर एखाद्या नाटकाचा प्रयोग जनता विद्यालयाच्या खुल्या मैदानात व्हायचा. ही समस्या लक्षात घेत नगर परिषदेने सुमारे १० कोटी रुपयांचा निधी खर्च करून खोपोली शहरात छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह (नाट्यगृह) नाट्य रसिकांसाठी खुले करून दिले. मात्र काही कामे अर्धवट राहिल्याने सुरुवातीला तीन वर्षे या नाट्यगृहाचा पडदा उघडलाच नाही. त्याचे वृत्त कोरोना महामारीपूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्याची दखल घेऊन नगर परिषदेने काही कामे तातडीने पूर्ण केली. त्यानंतर या सभागृहात काही नाट्यप्रयोगही झाले.

दरम्यान, कोरोना, लॉकडाऊन काळात हे नाट्यगृह बंद होते. सुरक्षा रक्षक नसल्यामुळे या काळात नाट्यगृहाची पुरती दैनावस्था झाली. नाट्यगृहाचे मुख्य प्रवेशद्वार, आतील दरवाजे तुटले आहेत. तिकीटघराची दुरवस्था झाली आहे. विजेवर चालणारी उपकरणे, वातानुकूलित यंत्रणा, साउंड सिस्टीम, प्रकाश योजना बंद पडली आहे. आसन व्यवस्थेची मोडतोड झाली आहे. जनरेटर धूळ खात पडले असून, नाट्यगृहाचा परिसर गवताने भरला आहे. मद्यप्रेमींनी येथे अड्डा बनविला, तर काहींनी नाट्यगृहासमोर आपले संसार मांडल्याचे दिसत आहे.

खालापूर तालुक्यातील नाट्यकर्मी उल्हासराव देशमुख, नाट्यप्रयोग आयोजक प्रशांत कुलकर्णी, नाट्य कलाकार आणि दिग्दर्शक प्रवीण पुरी यांनी खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह (नाट्यगृह) तातडीने सुरू करण्याची मागणी नगरपालिकेकडे केली आहे. मुख्याधिकारी अनुप दुरे-पाटील यांनी त्याची दखल घेत नाट्यगृहाची पाहणी केली. सदर भव्यदिव्य इमारतीची दुरवस्था पाहून त्यांनीही खेद व्यक्त केला. नगरपालिका आर्थिक संकटात असली तरी जमेल तसे आर्थिक नियोजन करून नाट्यगृह सुरू करू, असे आश्वासन मुख्याधिकारी दुरे-पाटील यांनी दिले आहे.

खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह (नाट्यगृह) ची सध्याची दैनावस्था पाहता दुरुस्तीसाठी मोठा खर्च येणार आहे. त्यासाठी निधी उपलब्ध व्हावा, या करिता राज्याच्या सांस्कृतिक विभागाला निवेदन देणार असल्याचे नाट्यप्रेमी उल्हासराव देशमुख यांनी सांगितले.

## माथेरान सनियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी के. पी. बक्षी

**कर्जत : बातमीदार**

माथेरान सनियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त सनदी अधिकारी के. पी. बक्षी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माथेरान सनियंत्रण समितीची मुदत मागील वर्षी संपली होती. त्यामुळे माथेरान नगर परिषद आणि इको सेन्सेटीव्ह समितीच्या हद्दीमधील विकासकामांना परवानगी मिळत नव्हती. या समितीचे गठन केले आहे. दरम्यान, निवृत्त सनदी अधिकारी के. पी. बक्षी हे आता माथेरान सनियंत्रण समितीचे नवीन अध्यक्ष असतील.

सुप्रीम कोर्टाने माथेरान व परिसराचा इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये समावेश केल्यानंतर फेब्रुवारी २००३ मध्ये केंद्रीय पर्यावरण खात्याने अधिसूचना जारी करून विविध प्रकारचे निर्बंध घातले. माथेरान सनियंत्रण समिती स्थापन करून कोणत्याही पद्धतीची विकासकामे करण्यासाठी नगरपालिका प्रशासन आणि सर्व यंत्रणांना या सनियंत्रण समितीची परवानगी घेणे आवश्यक केले होते. या सनियंत्रण समितीची मुदत मागील वर्षी संपली होती. त्यामुळे माथेरान नगर परिषद आणि इको सेन्सेटीव्ह समितीच्या हद्दीमधील विकासकामांना परवानगी मिळत नव्हती, तसेच शासनाने निधी मंजूर केलेली आणि खाजगी कामेही सनियंत्रण समिती अस्तित्वात नसल्याने रखडली होती.

# सुधागडात गावठी भाज्यांची चलती

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आदिवासी बांधव विविध गावठी भाज्यांची लागवड करतात. सध्या या भाज्या तालुक्यातील विविध बाजारपेठांत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. मुंबई, पुण्यातून येणाऱ्या भाज्यांच्या तुलनेत या स्वस्त, ताज्या व आरोग्यवर्धक गावठी भाज्या खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड होत आहे.

**खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड**

परतीच्या पावसामुळे भाजीपाल्याचे नुकसान झाल्याने पुणे व नवी मुंबई येथील बाजारातून रायगड जिल्ह्यात येणाऱ्या भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे त्या भाज्यांच्या किमती प्रचंड वधारल्या आहेत, मात्र सुधागड तालुक्यातील डोंगर उतारावर, तसेच रानमाळावर लागवड केलेल्या विविध गावठी भाज्यांचे सध्या भरघोस उत्पादन मिळत आहे. तालुक्यातील बाजारांत सध्या शिराळे, घोसाळे, कार्ली, माठ, वांगी, भेंडी, काकडी, दुधी, गवार, ठाकरी मिरच्या, टॉमेटो अशा गावठी भाज्या मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. स्वस्त दरात या भाज्या मिळतात, तसेच रासायनिक खते किंवा कीटकनाशकांचा वापर न करता केवळ सेंद्रीय खतावर तयार झालेल्या या भाज्यांना खूप मागणी आहे. या आदिवासी महिला झेंडू आणि अस्टरची फुलेदेखील विक्रीसाठी आणतात.

रोज पहाटे डोक्यावर भाज्यांची टोपली घेऊन आदिवासी महिला बाजारात येतात. यासाठी त्यांना खूप मेहनत आणि कष्ट घ्यावे लागतात, असे ताई वाघमारे या रानभाजी विक्रेत्या महिलेने सांगितले.



(छाया : धम्मशील सावंत)

**बाजारभावापेक्षा स्वस्त दरात व सहज मिळणाऱ्या गावठी भाज्यांना अधिक पसंती देतो. गावठी भाज्या चविस्ट असतात, तसेच सेंद्रीय पद्धतीने पिकविल्या असल्याने त्या आरोग्यासदेखील उत्तम असतात.**

**–अश्विनी शिंदे, गृहिणी, पाली, ता. सुधागड**

## चौगुले यांच्या कवितासंग्रहाला राज्यस्तरीय पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील कवयित्री सायराबानू वजीर चौगुले यांच्या चांदणं शब्दांचं या कवितासंग्रहाला वाशिम येथील तेजभूषण बहुउद्देशिय सामाजिक विकास संस्थेने तेजभूषण साहित्यगौरव हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे.



पुणे येथे २६ डिसेंबर २०२१ रोजी होणाऱ्या संस्थेच्या संमेलनात सायराबानू चौगुले मान्यवरांच्या हस्ते तेजभूषण साहित्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे आयोजक काशिनाथ भगीरथ यांनी दिली. पुरस्काराबद्दल सायराबानू चौगुले यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## माणगावमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने माणगाव विधी सेवा समिती आणि वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कूलमध्ये गुरुवारी (दि. २१) कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. इयत्ता आठवी ते बारावीचे विद्यार्थी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



(छाया : सलीम शेख)

या शिबिरात माणगाव येथील जिल्हा न्या. एन. एस. कोले यांनी दिवाणी व फौजदारी कायद्यांचे स्वरूप स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ॲड. विनोद घायाळ यांनी इंटरनेट हाताळताना कोणती काळजी घ्यावी, त्याचे दुष्परिणाम काय? तसेच अल्पवयीन विद्यार्थ्यांने विनापरवाना गाडी चालविण्यास कोणती परिस्थिती उद्भवू शकते याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली. ॲड. संस्कृती शिंदे यांनी आरटीईबद्दल मार्गदर्शन केले. ॲड. चंद्रशेखर माणके यांनी पॉक्सो ॲक्टबद्दल माहिती दिली, तर ॲड. यशवंत साधू यांनी बालमजूर प्रतिबंध व नियमन कायदा १९८६ याबाबत माहिती दिली.

विभावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. माणगाव वकील संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. मोहन मेथा, माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. एम. एस. निकम, शालेय व्यवस्थापन समितीचे चेअरमन ॲड. प्रकाश ओक, सहसचिव विक्रांत सप्रे, सदस्य ॲड. राहुल ओक या वेळी उपस्थित होते. प्राचार्या संगीता कोकाटे यांनी आभार मानले.



# नामिबिया सुपर १२ फेरीत

## आयर्लंडवर मात

**शारजा : वृत्तसंस्था**

नामिबियाने आयर्लंडचा आठ गडी आणि नऊ चेंडू राखून धुव्वा उडवत पहिल्याच ट्वेन्टी-२० विश्वचषकात अव्वल-१२ फेरी गाठण्याचा पराक्रम केला.

डावखुरा गोलंदाज जॅन फ्रॅलिंकच्या (३/२१) भेदक माऱ्यामुळे आयर्लंडला ८ बाद १२५ धावांपर्यंतच जेमतेम मजल मारता आली. प्रत्युत्तरात कर्णधार जेरार्ड इरास्मस आणि डेव्हिड वीज यांच्या योगदानामुळे नामिबियाने आयर्लंडने दिलेले १२६ धावांचे लक्ष्य १८.३ षटकांत गाठले. इरास्मसने चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४९ चेंडूंत ५३ धावा केल्या, तर वीसने १४ चेंडूंत एक चौकार आणि दोन षटकार ठोकत नाबाद २८ धावा केल्या. त्याने डावाच्या १५व्या षटकात सलग चेंडूंत दोन षटकार ठोकून सामना नामिबियाच्या दिशेने फिरवला. वीसने २२ धावांत दोन बळीही घेतले. त्याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. या संघाचे क्रिकेटविश्वात कौतुक होत आहे.

## श्रीलंकेने नेदरलँड्सला गुंडाळले

**शारजा** : टी-२० विश्वचषक स्पर्धेत श्रीलंकेने नेदरलँड्सचा पालापाचोळा करीत आठ गड्यांनी सहज विजय नोंदवला. या विजयासह श्रीलंका ग्रुप एमध्ये तीन सामन्यात तीन विजयासह अव्वल स्थानी आहे.

शारजा मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लंकेच्या माऱ्यासमोर दुबळा नेदरलँड्स संघ टिकाव धरू शकला नाही. १० षटकांत अवघ्या ४४ धावांवर नेदरलँड्स सर्वबाद झाला. लंकेकडून लहिरू कुमारा आणि वनिंदू हसरंगा यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. प्रत्युत्तरात श्रीलंकेने दोन गडी बाद करून विजय साकारला.

# आरपीएल नॉकआउट स्पर्धा उत्साहात
# आता वेध मुख्य थराराचे



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लीग टी-२० नॉकआउट क्रिकेट स्पर्धा खारघर येथील इमामपुरीच्या मैदानावर उत्साहात झाली. रायगड एच संघ विरुद्ध रायगड के संघ असा अंतिम सामना रंगला. त्यात रायगड एच संघाने बाजी मारत विजेतेपद पटकाविले. आता मुख्य स्पर्धा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार आहे.

आरपीएलच्या लिलाव प्रक्रियेत ज्या खेळाडूंना स्थान मिळू शकले नाही अशा खेळाडूंसाठी आयोजकांनी बाद पद्धतीची स्पर्धा आयोजित केली होती. एकूण १६ संघांचा यामध्ये समावेश होता. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूला टी-शर्ट व अल्पोपहाराची व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली होती. जवळ जवळ दीड वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर खेळाडूंना क्रिकेटचा आस्वाद घ्यायला मिळाल्याचा आनंद प्रत्येकाने मनोसक्त घेतला. नॉकआऊट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १६ खेळाडूंना आरपीएलच्या मूळ स्पर्धेत थेट वाईल्ड कार्ड एण्ट्री देण्यात येणार आहे.

नॉकआऊट स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आरपीएलचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव जयंत नाईक, उपाध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, खजिनदार कौस्तुभ जोशी, कार्याध्यक्ष जितेंद्र नाईक, सहसचिव संदीप जोशी, प्रदीप खलाटे, चंद्रकांत म्हात्रे, प्रीतम पाटील, सुनील सरगर, कुणाल पाटील, महेंद्र भाटिकरे उपस्थित होते. नॉकआऊट स्पर्धेनंतर आता संपूर्ण रायगड जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींना वेध लागले आहेत ते आरपीएलच्या थराराचे.

## आरोग्य प्रहर

# भात खाण्याचे फायदे

जेव्हा कोणी वजन कमी करण्याचा विचार करतो तेव्हा सर्वप्रथम तो भात न खाण्याचा विचार करतो किंवा कमी करतो. तांदूळ तुमच्या आरोग्यासाठी खरोखर वाईट आहे का? तर उत्तर नाही असे आहे. अनेक पोषण तज्ज्ञ सांगतात की भात खाल्ल्याने आपल्या शरीरासाठी अनेक फायदे होतात.

**तांदूळ प्रीबायोटिक आहे** – तांदळाचा भात खाल्ल्यानंतर पोट खूप लवकर भरते, जेणेकरून पचन प्रणाली मजबूत होते.

**रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते** – जर भात दही, भात आमटी, शेंगा, तूप आणि मांसासह भात खाल्ला तर ते रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतो.

**सहज पचण्याजोगे** – भात सहज पचतो आणि पोटासाठी तो हलका असतो. भात खाल्ल्यानंतर आपल्याला चांगली झोप यायला मदत होते, ज्यामुळे हार्मोनल संतुलन चांगले होते.

**त्वचेसाठी चांगले** – भात खाणे त्वचेसाठी उत्तम आहे. जर तुमच्या शरीरावर वाढलेली छिद्र दिसली, तर भात त्यांच्यापासून सुटका करण्यास मदत करू शकतो.

**केसांच्या वाढीसाठी उपयुक्त** – केसांच्या वाढीमध्ये भात खाणे खूप मदत करतो. जर कुणाला केस गळण्याची तक्रार असेल तर त्याने नक्कीच भाताचे सेवन केले पाहिजे.

**आजारांना ठेवते दूर** – भातामध्ये असे काही घटक आहेत ते आजारांना दूर करण्यास मदत करते. भातामधील अँटी-ऑक्सिडंट प्रापर्टीज अनेक आजारांसाठी गुणकारी आहे.







पनवेल : भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हातर्फे भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संगीत, नृत्य व नाटकांच्या मेजवानीने परिपूर्ण अशा मनोरंजन अनलॉक २.० कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा कार्यक्रम रंगला. या वेळी कलाकारांनी आपल्या कलेचे उत्तम सादरीकरण केले. त्यास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.













# तायक्वांडो लीगमध्ये रायगडच्या खेळाडूंचे यश









**पनवेल** : दुसऱ्या हीरो तायक्वांडो आंतरराष्ट्रीय लीग (पुमसे) २०२१ या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून चौघांनी पदके जिंकली आहेत. ऑनलाइन झालेल्या या स्पर्धेत संपूर्ण जगभरातून ८०० खेळाडू सहभागी झाले होते. रायगड तायक्वांडो असोसिएशनकडून खेळताना अनन्या चितळे हिने सुवर्णपदक, पुनित नितीन पाटील व ओमकार भगत यांनी रौप्य, तर जय पाटील याने कांस्यपदक पटकाविले. त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांना सुभाष पाटील व प्राजक्ता अंकोलेकर यांचे मार्गदर्शन लाभले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com